# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

**दिनांक ३०.०६.२०२६ मंगळवार**

**(कामगिरी)**

**१) गुन्हेशाखा वाहन चोरी विरोधी पथकाची कामगिरी :— हद्दपार ईसमास अटक.**

दिनांक ३०.०६.२०२६ चे १५.०० वा. चे सुमारास, गुन्हेशाखा वाहन चोरी विरोधी पथकातील अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे वाडी हद्दीत वाहन चोरीचे घटनास्थळी भेट देणेकामी व आरोपींचे शोधार्थ पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहीती मिळाली की, हद्दपार असलेला मिलींद खिल्लारे नावाचा इसम हा पोलीस ठाणे वाडी हद्दीत प्रकाश इंस्टीटयुट कडे जाणारे रोडवर फिरत आहे. अशा मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, नमुद ठिकाणी जाऊन परिसरात शोध घेतला असता, प्राप्त वर्णनाचा इसम दिसून आला. त्यास ताब्यात घेऊन पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव मिलींद विश्वनाथ खिल्लारे वय ४० वर्षे रा. आठवा मैल, हिलटॉप कॉलनी, मंडपे ले आऊट, वार्ड क्र. ३, वाडी, नागपूर असे सांगीतले. आरोपीस पोलीस ठाणे येथे आणून, त्याचा गुन्हे अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उपआयुक्त परिमंडळ क्र. ०१ यांचे हद्दपार आदेश क्र. ०३/२०२४, दिनांक १२.११.२०२४ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०२ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे वाडी येथे आरोपीविरूध्द कलम १४२,१३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. आरोपीस पुढील कार्यवाहीस्तव वाडी पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी नागपूर शहरचे मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. राजेंद्र दाभाडे, मा. पोलीस उपायुक्त (डिटेक्शन) श्री. दीपक अग्रवाल, मा. सहायक पोलीस आयुक्त (अती. कार्य. गुन्हेशाखा) श्री. शिवप्रसाद पारवे यांचे मार्गदर्शनात सपोनि. नितीन चुलपार, पोहवा विलास कोकाटे, पंकज हेडाऊ व राहुल कुसरामे यांनी केली.

**२) एमआयडीसी पोलीसांची कामगिरी :— हद्दपार ईसमास घातक शस्त्रासह अटक.**

दिनांक ३०.०६.२०२६ चे १३.३० वा. चे सुमारास, एमआयडीसी पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहीती मिळाली की, हद्दीतील तडीपार असलेला राहुल नावाचा इसम हा पाणी फिल्टर टाकीजवळ, सिरॅमिक कंपनी सेंटर, एमआयडीसी रोडवर फिरत आहे. अशा मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, नमुद ठिकाणी जाऊन परिसरात शोध घेतला असता, प्राप्त वर्णनाचा इसम दिसून आला. तो पोलीसांना पाहुन पळुन जात असता, त्याचा पाठलाग करून ताब्यात घेतले. त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव राहुल गौतम राऊत वय २४ वर्षे रा. भिमनगर, गायधने किराणा दुकानाजवळ, एमआयडीसी, नागपूर असे सांगीतले. पंचासमक्ष त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे पॅन्टचे आत कंबरेत एक लोखंडी चाकू कि. २५०/— रु. चा मिळून आल्याने जप्त करण्यात आला.

आरोपीस पोलीस ठाणे येथे आणून, त्याचा गुन्हे अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उपआयुक्त परिमंडळ क्र. ०१ यांचे हद्दपार आदेश क्र. ०७/२०२४, दिनांक १२.११.२०२४ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०२ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत घातक शस्त्रासह दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे एमआयडीसी येथे आरोपीविरूध्द कलम १४२,१३५ म.पो.का., सहकलम ४,२५ भा.ह.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी नागपूर शहरचे मा. अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) श्री. वसंत परदेशी, मा. पोलीस उप आयुक्त (परि.क्र. १) श्री. सिंगा रेड्डी ऋषिकेश रेड्डी, मा. सहा. पोलीस आयुक्त (एमआयडीसी विभाग) श्री. सतिशकुमार गुरव यांचे मार्गदर्शनात वपोनि. गोकुळ महाजन, पोहवा. सुनिल बैस, दीपक सराटे, जितेंद्र खरपुरीया, पोअं. रवि राठोड व निलेश दुबे यांनी केली.

## (अकस्मात मृत्यु)

**<u>१) पोलीस ठाणे इमामवाडा</u>:—** दिनांक ३०.०६.२०२६ चे ११.३० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे इमामवाडा हद्दीत, घाट रोड जवळ एक अनोळखी पुरूष वय अंदाजे ४० वर्षे वयाचे बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने, त्यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी तपासून मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही. मृतकाचे वर्णन—रंग—गोरा, बांधा—सडपातळ, उंची ५ फुट ३ इंच, डोक्याचे केस—काळे, दाढी—बारीक, अंगात—पांढरी बनियान व निळ्या रंगाचा बरमुडा घातलेला आहे. नमुद मृतकास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे इमामवाडा येथे संपर्क साधावा.

याप्रकरणी फिर्यादी रेल्वे पोलीस अंमलदार मातादीन गुजर यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे इमामवाडा येथे मसपोनि. राजश्री चंदापुरे ८९७५४६४११८ यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**<u>२) पोलीस ठाणे सिताबर्डी</u>:—** दिनांक ३०.०६.२०२६ चे ११.२० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे सिताबर्डी हद्दीत, राजकमल हॉटेलसमोर, आर्मी कंपाऊंडलगत एक अनोळखी पुरूष वय अंदाजे ४० ते ४५ वर्षे वयाचे बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने, त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी तपासून मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही.

याप्रकरणी फिर्यादी काशिक शकील अहमद वय ४५ वर्ष रा. चुना मशिदजवळ, तकीया दिवाणशाह, टिमकी, तहसील, नागपूर यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे सिताबर्डी येथे पोउपनि. हर्षद भालेराव यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

## (मिसिंग)

**<u>१) पोलीस ठाणे नंदनवन</u> :—** कु. अविना रुपचंद पटले वय १८ वर्षे रा. प्लॉट क्र. ८३, जट्टेवार सभागृहाजवळ, ईश्वरनगर, नागपूर ही दिनांक २५.०६.२०२६ रोजी पासून पोलीस ठाणे नंदनवन हद्दीतील राहते घरी कोणाला काही न सांगता घरुन निघून गेली. आजपावेतो घरी परत आली नाही. तिचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **<u>वर्णन</u>** रंग—गोरा, चेहरा—लांबट, बांधा—सडपातळ, उंची— ५ फुट २ इंच, केस—काळे, डोळे—काळे, अंगात—पिवळा रंगाचा सलवार सुट घातलेला आहे. भाषा—हिंदी बोलते. ओळखचिन्ह— चेहऱ्यावर तिळ आहे.

**<u>२) पोलीस ठाणे हुडकेश्वर</u> :—** कार्तिक रामदास अंबुलकर वय १३ वर्षे रा. प्लॉट क्र. ४७, अवधुत नगर, गल्ली क्र. २, हुडकेश्वर, नागपूर हा दिनांक २५.०६.२०२६ चे २०.३० वा. ते २१.०० वा. चे दरम्यान,

पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीतील राहते घरुन आईने रागावल्याचे कारणावरुन घरी कोणाला काही न सांगता घरुन निघून गेला. घरी परत आला नाही. त्याचा शोध घेतला असता मिळून आला नाही. **वर्णन** रंग—सावळा, चेहरा—लांबट, बांधा—मध्यम, उंची—५ फुट, डोक्याचे केस—काळे, डोळे—काळे, अंगात—काळया रंगाचा हॉफ टि—शर्ट व नेवी ब्ल्यु रंगाचा बरमुडा ज्यावर पांढरे फुलांची डिझाईन आहे. भाषा—मराठी/हिंदी बोलतो.

**३) पोलीस ठाणे हुडकेश्वर :—** सौ. सिमा भुमेश्वर सावरकर वय ३४ वर्षे रा. प्लॉट क्र. १९, निलकमल नगर, हनुमान मंदीरजवळ, नरसाळा, हुडकेश्वर, नागपूर हया त्यांची मुलगी कु. दिव्या भुमेश्वर सावरकर वय ५ वर्ष हिचेसह दिनांक २३.०६.२०२६ चे २२.०० वा. ते २४.०६.२६ चे १०.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीतील राहते घरी कोणाला काही न सांगता घरुन निघून गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **सौ. सिमा वर्णन** रंग—गोरा, चेहरा—गोल, बांधा—मजबुत, उंची—५ फुट, डोक्याचे केस—काळे व लांब, डोळे—काळे, अंगात—गुलाबी रंगाची कुर्ती व काळया रंगाचा पायजामा घातलेला आहे. भाषा—मराठी/हिंदी बोलतात. **कु. दिव्या वर्णन** रंग—गोरा, चेहरा—गोल, बांधा—सडपातळ, उंची— अडीच फुट, डोक्याचे केस—काळे लहान, डोळे—काळे, अंगात—पांढरा फ्रॉक घातलेला आहे. भाषा—मराठी बोलते.

**४) पोलीस ठाणे नंदनवन :—** सौ. किरण रुपचंद वांढरे वय ४० वर्षे रा. प्लॉट क्र. ९९, शेष नगर, हल्दीराम एजन्सीजवळ, नंदनवन नागपूर हया दिनांक २५.०६.२०२६ चे १२.०० वा. सुमारास, पोलीस ठाणे नंदनवन हद्दीतील राहते घरी कोणाला काही न सांगता घरुन निघून गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. सौ. सिमा **वर्णन** रंग—गोरा, चेहरा—गोल, बांधा—सडपातळ, डोक्याचे केस—काळे व लांब, डोळे—काळे, अंगात—पांढरा भुरकट कुर्ता घातलेला आहे. भाषा—मराठी/हिंदी बोलतात. ओळखचिन्ह—कंबरेवर ऑपरेशनचे निशान आहे.


कु. अविना


कार्तिक


सौ. सिमा व दिव्या


सौ. किरण

**(ईतर)**

**आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :—**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी, कोर्ट क्रं. १३, नागपुर. | ३००१७५ /२०१३ | कलम २९४ भा. दं.वि. | किशोर उर्फ गोलू प्रभुदयाल बावणकर रा. बेलतरोडी, लाकडी पुल स्टॉपजवळ, हुडकेश्वर, नागपुर | ०३.७.२०२६ |

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उपनिरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**